# मोशे आणि जुन्या करारातील नियमशास्त्र दिले

## ग्रथपंचक भाग 3: निर्गम, देवाने नियमशास्त्र दिले.

मुलांना शिकविणाऱ्यांनी P2b3 हा अभ्यास वाचावा.

**प्रार्थना:** ''प्रिय प्रभू, तू प्राचीन काळी इस्राएलाला दिलेल्या आज्ञाचा आजच्या काळातील हेतू समजून घेण्यास साहाय्य कर.''

**1. देवाच्या वचनाने तुमच्या अंत:करणाची व मनाची तयारी करा.**

निर्गम 19-20 वाचा आणि देवाने त्याच्या दहा आज्ञाचा स्वीकार करण्यासाठी लोकांची कशी तयारी केली ते पाहा. ह्या दहा आज्ञाच जुन्या करारातील नियमशास्त्राचा गाभा आणि पाया होता.



दहा आज्ञा (संक्षिप्त)

माझ्याखेरीज अन्य देव नसावेत.

मूर्तीपूजा करू नका.

देवाचे नाव व्यर्थ घेऊ नका. शब्बाथ दिवसाची आठवण ठेवा.

आपल्या आई वडिलांचा मान राखा.

खून करू नका.

व्यभिचार करू नका.

चोरी करू नका.

खोटी साक्ष देऊ नका.

इतरांच्या वस्तूंचा लोभ धरू नका.

निर्गम 20:1-17 मध्ये पाहा आज्ञा विषयीचा पूर्ण शास्त्रलेख, यालाच जुन्या करारामध्ये नियमशास्त्र किंवा करार असेही म्हटलेले आहे.

दहा आज्ञाविषयीची ऐतिहासिक वस्तुस्थिती:

- देवाने इस्राएल लोकांना मिसराच्या गुलामगिरीतून अद्‌भुतरित्या सोडविले. त्यासाठी त्याने तांबड्या समुद्रात रस्ता तयार केला. या अद्‌भुत सुटकेनंतर लागलीच देवाने प्राचीन इस्राएली लोकांना दहा आज्ञा दिल्या. दयेच्या ह्या अद्‌भुत चमत्कारामुळे त्यांनी देवाचे आज्ञापालन करणे आवश्यक होते (निर्गम 20:2).
- प्राचीन नियमशास्त्रामध्ये ह्या दहा मुख्य आज्ञेंशिवाय 612 नियम होते. उपासना फक्त यरूशलेमेमध्येच केली पाहिजे, शब्बाथ दिवशी काम करणाऱ्या लोकांना ठार मारणे, सातव्या वर्षी जमिनीची पेरणी न करणे, पशूयज्ञ करणे यासारखे त्यातील अनेक नियम आपल्या लोकांनी पाळावेत अशी अपेक्षा देव आता करीत नाही. जुन्या करारातील फारच थोड्या नियमांची जुन्या करारात आवश्यकता आहे. प्रीतीचा नियम हा दोन्ही करारांचा आद्य नियम आहे (अनुवाद 6:4-5). विश्वासणाऱ्यांनी विशेष दिवस पाळणे आणि

मान्यता दिलेले अन्नच खाणे आवश्यक आहे असे सांगणाऱ्यांची प्रेषित पौलाने कानऊघाडणी केली होती (गलती 3:1-3; 4:9-11; कलस्सै 2:16-17).

- मोशेने आपल्या सासऱ्याचा इथ्रोचा सल्ला मानला आणि देवाच्या लोकांचा न्यायनिवाडा करण्यासाठी नायकांची नेमणूक केली (निर्गम 18:24-25). ह्या न्यायाधीशांना देवाचे नियम माहिती असणे आवश्यक होते (निर्गम 19:7). एकेकाळी रानात भटकाणाऱ्या इस्राएली लोकांनी एका पर्वताजवळ तळ दिला. याच पर्वताला पुढे सीनाय पर्वत म्हणू लागले. लोकांनी पर्वतावर चढण्याचा प्रयत्न करू नये अन्यथा ते मरण पावतील असे देवाने त्यांना सांगितले होते (निर्गम 19:2-5). फक्त मोशेलाच पर्वतावर जाण्याची परवानगी होती. मोठा प्रचंड गडगडाट, विजांचे चमकणे आणि दाट ढग यांसह देव त्या पर्वतावर आला, सर्व पर्वत थरथरू लागला (निर्गम 19:16-20). येथेच देवाने मोशेला दगडी पाट्यांवर लिहिलेल्या दहा आज्ञा दिल्या (निर्गम 24:12).
- दहा आज्ञांपैकी नऊ आज्ञांचा पुनरूच्चार नव्या करारामध्ये केलेला आहे. या आज्ञा ख्रिस्ती विश्वासणाऱ्यांनी पाळणे अगत्याचे आहे. ख्रिस्ती लोकांनी सातवा दिवस विश्रांतीसाठी वेगळा ठेवणे जरूरीचे नाही. आरंभीच्या काही ख्रिस्ती मंडळ्या 'आठवड्याच्या पहिल्या दिवशी' एकत्र जमत असत (प्रे. कृ. 20:7). देवाने शब्बाथाच्या ऐवजी अन्य कोणता दुसरा दिवस दिलेला नाही. त्याऐवजी त्याने आपल्या लोकांसाठी कराराने तरतूद केलेली व्याख्या बदलली (इब्री 4:3-12). काही मंडळ्यांमध्ये अद्यापही शब्बाथ हाच विश्रांतीचा वार आहे.
- सातवा दिवस जुन्या कराराप्रमाणे विश्रांतीसाठी आवश्यक होता. जुन्या करारातील अनेक नियमांप्रमाणे याचे लक्ष जुन्या व भौतिक निर्मितीवर केंद्रित होते, कारण देवाने जगाची निर्मिती केल्यावर सातव्या दिवशी विसावा घेतला (निर्गम 20:11).
- आठवड्याच्या पहिल्या दिवशी येशू मृतांतून पुन्हा उठला याचे लक्ष जुन्याची जागा घेणाऱ्या नव्या कराराच्या नव्या, आध्यात्मिक निर्मितीवर केंद्रित आहे. ख्रिस्ती लोकांचा नव्याने पवित्र आत्म्याच्याद्वारे जन्म होतो तेव्हा ते ह्या नव्या सार्वकालिक निर्मितीचा एक भाग होतात (यिर्मया 31:31-34; 2 करिंथ 5:17).
- देवाने जुन्या कराराच्या नियमशास्त्राच्या जागी नवा करार कृपेच्या कराराची स्थापना केली. येशूने नवा करार आपल्या रक्ताने स्थापन केलेला असल्यामुळे नवा करार विश्वासणाऱ्यांनी पाळण्यासाठीचे नवे नव्या प्रकारचे नियम प्रकट यालाच स्वातंत्र्याचा नियम (याकोब 1:14), विश्वासाचा नियम (रोम 3:27-28), प्रीतीचा नियम (गलती 5:14) आणि आत्म्याचा नियम (रोम 8:2-4) असे म्हटलेले आहे. जुने मरणाचे सेवाकार्य हे जुने नियमशास्त्र 'कोमेजून गेले' त्यांची जागा अधिक गौरवी आणि सार्वकालिक अशा 'आत्म्याच्या सेवाकार्याने' घेतली आहे (1 करिंथ 3:7-11).
- जुन्या करारातील नियमशास्त्राने मरण आणले कारण त्यातील आज्ञाचे पालन करणे कोणालाच शक्य नव्हते याचा उद्देश तिहेरी होता:
  1) यामध्ये प्राचीन इस्राएलसाठी नागरी व सैनिकी नियमांच्या व्याख्या दिलेल्या होत्या, त्यामुळे वडीलजनांना सूज्ञपणे न्यायनिवाडा करता येई;
  2) यामुळे पापाविषयीचे ज्ञान झाले (रोम 3:19-20);
  3) ही पुढे येणाऱ्या अधिक चांगल्या गोष्टींची, आम्हाला जिवे मारणारी आमची मृत्युपत्रे 'वधस्तंभावर खिळून' रद्द करणाऱ्या ख्रिस्ताकडे पातक्यांना नेणारी 'छाया' किंवा 'शिक्षक' असे होते (गलती 3:24-25; कलस्सै 2:14-17).

**वाचा निर्गम** 32, देव मोशेला दहा आज्ञा देतो त्याचा आणखी एक वृत्तांत. पाहा:

- देवाला इस्राएल लोकांचा राग- संताप का आला?

- देवाने मूर्तिपूजकांचा नाश करण्याविषयी आपले मन का बदलले?
- आपल्या रागामुळे मोशेने आज्ञापटांच्या बाबतीत कोणता मूर्खपणा केला?

**2. विश्वासणाऱ्यांना पुढील आठवड्यात 'नियमावर बोट ठेवण्यापेक्षा' एकमेकांना पवित्र आत्म्याच्या मार्गदर्शनाने कशी मदत करता येईल याविषयी योजना आखा.**

समजा एखाद्या विश्वासणाऱ्याचा जुन्या करारातील नियमांविषयी गोंधळ उडाला असेल तर त्यांची भेट घेऊन या अभ्यासामध्ये दिलेली सत्ये त्यांना समजावून सांगा. ख्रिस्ती विश्वासणारे आता कृपेच्या नव्या कराराखाली जीवन जगतात हे त्यांना स्पष्ट करून सांगा, ख्रिस्ती लोकांच्या जीवनाचे बारिक सारिक तपशील लिखित नियम नियंत्रित करीत नाहीत तर आम्ही प्रीतीच्या नियमाचे पालन करतो तेव्हा स्वातंत्र्याच्या नियमाद्वारे पवित्र आत्मा ख्रिस्ती लोकांना मार्गदर्शन करतो.

समजा, आपल्याला जुन्या करारातील नियम पाळणे बंधनकारक आहे असे विश्वासणाऱ्यांना वाटत असेल तर त्यांची नियम शास्त्राच्या बंधनातून सुटका व्हावी यासाठी प्रार्थना करा. त्यांना रोम 6:14 हे वचन पाठ करण्यास सांगा. ''तुम्ही नियमशास्त्राधीन नाही तर कृपेच्या अधीन आहा, म्हणून पाप तुमच्यावर सत्ता चालविणार नाही.''

समजा, विश्वाणाऱ्यांना अद्याप प्रीतीमधील येशूच्या आज्ञांचे पालन करण्याऐवजी जुन्या नियमांच्याच मागे जायचे असेल त्यांना वाचून दाखवा. कलस्सै 2:16-17: ''तर मग खाण्यापिण्याविषयी, तसेच सण, अमावस्या किंवा शब्बाथ पाळण्याविषयी कोणाला तुमचा निर्णय करू देऊ नका; ह्या बाबी पुढे होणाऱ्या गोष्टींच्या छाया आहेत; शरीर तर ख्रिस्ताचे आहे.''

**3. सहकाऱ्यांशी चर्चा करून पुढील उपासनेसाठीचे कार्यक्रम ठरवा.**

सध्याच्या गरजा आणि स्थानिक रिवाजांनुसार कार्यक्रमांची निवड करा.

देवाने इस्राएली लोकांना दहा आज्ञा कशा दिल्या आणि पाप करणाऱ्यांवर देवाने दया करावी अशी काकुळतीची विनंती मोशेने कशी केली याविषयी सांगा.

स्पष्ट करा जुन्या करारातील नियमशास्त्राविषयी ऐतिहासिक वस्तुस्थिती (वरील भाग 1).

**स्पष्ट करा** देवाने जुन्या नियमशास्त्राच्या जागी नव्या कृपेच्या कराराची स्थापना कशी केली (वरील भाग 1).

**मुलांना त्यांनी तयारी केलेली नाटिका,** कविता व प्रश्न सादर करण्यास संधी द्या.

**स्पष्ट करा** जुन्या नियमशास्त्राशी संघर्ष करणाऱ्या लोकांची भेट घेण्याच्या तुमच्या योजनेविषयी सहकाऱ्यांशी चर्चा करा.

**पाठ करा** योहान 1:17 ''कारण नियमशास्त्र मोशेच्याद्वारे देण्यात आले होते; कृपा व सत्य ही येशू ख्रिस्ताच्या द्वारे आली.''

प्रभुभोजनाची ओळख करून देण्यासाठी कलस्सै 2:13-14 वाचा. येशूचे रक्त आम्हाला मरणाच्या नियमाच्या शापापासून मुक्त करते आणि प्रभुभोजन त्याच्या रक्ताचे यज्ञार्पण साजरे करते हे स्पष्ट करा.

दोन वा तीन जणांच्या गटांमध्ये प्रार्थना करा आणि एकमेकांना साहाय्य करा. नव्या कराराच्या विश्वासणाऱ्यांना देव आता जुने नियम पाळा असे सांगत नाही हे जुने नियम पाळायचे की नाही याविषयी संघर्ष करणाऱ्या लोकांना समजून सांगण्याच्या योजनांना अंतिम स्वरूप द्या.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net